# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

सूचना का अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००८६५**

**अपिलार्थी श्री. तुळशीदास मुरारी कवाळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (जल-२)**
मृद व जलसंधारण विभाग, ७ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
मृद व जलसंधारण विभाग, ७ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०७.२०२४</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०७.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.१२.२०२१ | ११.०१.२०२२ | १७.०१.२०२२ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०३.०३.२०२२ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ११.०१.२०२२ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ०६.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार अहमदनगर विभागाचे दि.२०.१०.२०२१ च्या पत्राच्या अनुषंगाने तसेच दि. ०६.११.२०२१ रोजीचा अर्ज विचारात घेऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०१.२०२२ रोजी अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नाशिक या कार्यालयाकडे उपलब्ध असल्याने त्यांचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नाशिक या कार्यालयाकडे हस्तांतरीत केलला आहे. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १७.०१.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अभिलेखावर उपलब्ध नाहीत.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी शासन पत्र दि. ३१.०१.२०२२ आयोगाच्या निदर्शनास आणले जेथे की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाबाबत वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे. तसेच, सहा. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर यांचे दि. ०५.१०.२०२१ चे पत्र सादर केले. जेथे की, मुद्दा क्र. ४ मध्ये अपिलार्थींनी विचारलेली माहिती कळविण्यात आलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
12-7-2024

**मुंबई**
**दिनांक : १२.०७.२०२४**

State Information Commission
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ